October - 2021 (1)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रभाग समिती क्र.02
### डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, भाईंदर (प.) ता. जि.ठाणे. 401101

जा.क्र.मनपा/प्र.का.क्र.02/2004/2021-2022 दि. 08/ 10/2021

प्रति
जनमाहिती अधिकारी तथा
विधी अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र 01... मा.अ....
दिनांक: 05/10/2021.......

विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती मिळणे बाबत... मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.2 मधील भाईंदर (प.) पोलिस स्टेशन ते राम मंदिर रोड येथील फेरीवाल्याबाबतची माहिती...

संदर्भ :- श्री. प्रमोद ब. देठे यांचेकडिल दि.23/09/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदया,

उपरोक्त् संदर्भिय पत्रातील नमुद मुद्दा क्र.3 आपल्या विभागाशी संबंधित असल्याने सदरचे पत्र आपल्या विभागाकडे कार्यवाहीस्तव वर्ग करण्यांत येत आहे.

कळावे,

सोबत :- संदर्भिय अर्जाची मुळ प्रत

(प्रियांका भोसले)
जन माहिती तथा सहा. आयुक्त्
प्रभाग समिती क्र.2
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
श्री. प्रमोद ब. देठे
दुकान नं.3अे, काशिमिरा पोलिस स्टेशनच्या बाजुला,
काशिमिरा, ठाणे

# शासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र ३

## माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
शासकीय माहिती अधिकारी,
प्रभाग अधिकारी,
प्रभाग क्र. २,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (पश्चिम), ठाणे ४०११०१.

9602
23/09/2021

१०रु. कोर्ट COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

१) अर्जदाराचे नाव : प्रमोद ब. देठे, (पत्रकार :मो. नं.९८९२८१८७०५)
२) पत्ता : शॉप नं ३ए,काशिमिरा पोलिस स्टेशनच्या बाजुला , काशिमिरा,ठाणे.
३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : मिराभाईंदर मनपा प्रभाग २ मधील भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते रामामंदिर रोड येथील फेरीवाल्या बाबत माहिती.

(एक) माहितीचा विषय : मिराभाईंदर मनपा प्रभाग २ मधील भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते रामामंदिर रोड येथील फेरीवाल्या बाबत माहिती.

(दोन) माहितीशी संबंधित कालवधी : महापालिकेत उपलब्ध असल्यापासुन २०२१ माहिती मिळेपर्यंत

(तीन ) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :
१) मिराभाईंदर महापालिका प्रभाग क्र. २ हद्दीतील भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते राममंदिर रोड विभागातील फेरीवाल्यांचे झालेल्या सर्वेक्षण बाबत माहिती फेरीवाल्यांच्या नावासह व्यावसायासह यादी देण्यात यावी.
२) भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते रामामंदिर रोड येथील अनधिकृत फेरीवाल्यांच्या विरोधात आलेल्या तक्रारी, केलेल्या कारवाईचा तपशिल संबंधित कागदपत्रांच्या छायाप्रतसह दयावी.
३) भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते राम मंदिररोड येथील अनधिकृत फेरीवाल्या विरोधात कोर्ट केसची माहिती व केसचा निकाल लागला असल्यास त्या आदेशाची छायाप्रत देण्यात यावी.
४) मनपा प्रभाग क्र. २ तर्फे भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते राम मंदिररोड येथील अनधिकृत फेरीवाल्यांबाबत महापौर,आयुक्त कार्यालय ,अतिरीक्त आयुक्त,उपायुक्त (अतिक्रमण) , विधी विभागाशी केलेल्या पत्रव्यावहाराची छायाप्रत दयावी.
५) भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते राम मंदिर रोड येथील अनधिकृत फेरीवाल्या विरोधात केलेल्या दंडात्मक कारवाई, जप्त केलेले साहित्य व फेरीवाल्याचे नाव, व्यावसायाच्या नावाची यादी व संबंधीत कागदपत्रांची छायाप्रत दयावी.
६) भाईंदर पश्चिम, पोलीस स्टेशन ते राम मंदिर रोड येथील अनधिकृत फेरीवाल्या विरोधात पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयाची माहिती देण्यात यावी.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीस आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल) : स्वतः
(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) :
(सात) अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे किंवा नाही : नाही.

ठिकाण: भाईंदर
दिनांक: 23/9/2021

Vaibhav Kuthe (J.E.).
Note & provide the necessary information within the stipulated period.

[signature]
24/9/2021

अर्जदाराची स्वाक्षरी
[signature]

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०१/२०२१-२२
दि. १२/१०/२०२१

प्रति,

श्री. प्रमोद देठे
शॉप नं. ३, मुंबई अहमदाबाद हायवे रोड
काशिमिरा पोलिस स्टेशनच्या शेजारी
काशिमिरा नाका, जि. ठाणे ४०११०७

**विषय** :- केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज.

**संदर्भ** :- १) आपला दि. २३/९/२०२१ रोजीचा अर्ज.

२) जनमाहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्र.क्र. ०२ यांचे पत्र दि. ०४/१०/२०२१

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय अर्जान्वये आपण मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. ०२ च्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत फेरीवाल्याबाबतची माहिती अपेक्षिली आहे. सदर अर्जातील मुद्दा क्र. ३ विधी विभागाशी संबंधित असल्याने प्रभाग क्र. २ यांनी सदर मुद्याची माहिती उपलब्ध करुन देणेकरीता सदरचा अर्ज विधी विभागाकडे वर्ग केला आहे. तरी आपणास मुद्दा क्र. ३ ची खालीलप्रमाणे माहिती देत आहे.

**मुद्दा क्र. ३** :- आपल्या अर्जातील सदर मुद्यानुसार आपण भाईंदर पश्चिम, पोलिस स्टेशन ते राम मंदिर रोड येथील अनधिकृत फेरीवाल्याविरोधात कोर्ट केसची माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास मिरा भाईंदर महानगरपालिकेविरुध्द फेरीवाले यांनी दाखल केलेल्या दाव्यांची यादी उपलब्ध करुन देत आहे. सदर यादीनुसार आपणास आवश्यक असलेल्या दाव्याची माहिती विधी विभागास दिल्यास सदर दाव्याची संचिका आपणास उपलब्ध करुन दिली जाईल तसेच आपणास आवश्यक असलेली कागदपत्रे विहित फी चा भरणा करुन उपलब्ध करुन घेता येईल.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. मारुती गायकवाड, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Seenadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Received
12/10/2021